"गुरुकुल"

PAGE No.
DATE / /

माननीय महोदय

तुरची प्रशिक्षण भवन ची स्थापना 06/04/2010 ला झाली. तुरची प्रशिक्षण भवन 62 एकर मध्ये सामावलेले आहे.

तुरची प्रशिक्षण भवनचे ब्रिदवाक्य
Save Environment Paper Less(office)work.
"PAPER LIGHT - PTC TURCHI"

तुरची प्रशिक्षण भवन हे एक नंदनवन आहे. जिथे नजर फिरवावी तिथे सगळीकडे हिरवळ आहे. हिरवळ असल्यामुळे इथे सुंदर मोकळी हवा खेळती राहते. खूप छान सुंदर वातावरण आहे. तुरची प्रशिक्षण भवन च्या वातावरणात एक वेगळी - प्रसन्नता, उत्साह, आनंद आहे. एक आगळा-वेगळा आत्मविश्वास आहे.

तुरची प्रशिक्षण भवनातील प्रशिक्षणार्थींची दिवसांची जी सुरवात होते ती म्हणजे कवायत मैदानात. येथील कवायत मैदान 350 मीटर ट्रकचे आहे. व द्वितीय कवायत मैदान 450 मीटर ट्रकचे आहे. इतके मोठे कवायत मैदान डोळे दिपवून टाकणार. मैदानाच्या समोर किल्ला चोहो बाजूला हिरवेगार झाडे आहेत. त्या झाडांच्या सावलीत बसण्यासाठी सोय आहे. आणि ह्या मैदानातील सगळ्यात आवडती गोष्ट म्हणजे गॅलरी नं 1 व गॅलरी नं. 2. ह्या गॅलरींना "आश्रय" म्हणून नाव देईल, पाच मिनिटाच्या ब्रेकचा "आश्रय".

"आश्रय" म्हणजे ज्या वातावरणातील नैसर्गिक विधी आहेत ऊन, वारा, पाऊस, ह्यापासून बचाव करण्यासाठी आपण जिथे "आश्रय" घेतो ते म्हणजे घर. ह्या दोन्ही गॅलऱ्या घराप्रमाणे आश्रय देतात.

PSI Bhosle
Scan the letter & upload on Website
27/12

गॅलरी म्हणजे आम्हा सर्व प्रशिक्षणार्थींसाठी सर्वस्व आहे "एक दोन, एक दोन" करत ह्या नऊ महिन्यात प्रत्येक सूर्योदयाची सुरुवात ह्या मैदानात करावी व सावधान विश्राम करत संपवावी. ह्या दोन्ही गॅलरीच्या मध्ये मंच आहे आणि त्या मंचावर झळकणारा झेंडा आहे. हा झेंडा जसा वाऱ्याच्या झोतावर जसा फडकतो तसेच इथल्या प्रत्येक प्रशिक्षणार्थीनी प्रत्येक गोष्टीत सातत्य ठेवून आपले पुढले आयुष्य उज्ज्वल करावे. अशी त्या ध्वजासमोर मी माझी इच्छा प्रकट करते.

सूर्योदयापासून ते आठवाजेपर्यंत "एक दो एक दो" करत खूप भूक लागलेली असते. लगेच पाऊले वळतात ती मेस मध्ये. मेस मध्ये इतका पट्टाशीर नाष्टा मी कधीच माझ्या आयुष्यात सुद्धा बघितला नाही. मला वाटत नाही अंबानी सुद्धा इतका पट्टाशीर नाष्टा करत असतील कारण वेळेचा अभाव. इथल्या प्रशिक्षणार्थींना एक अंडे, एक ग्लास दुध, एक केळ आणि रोजच्या ठरलेल्या मेनू प्रमाणे नाष्टा अप्रतिमच. मेस मधील जेवणाची सुविधा अतिशय उत्कृष्ट आहे. त्या मेसमध्ये छान जुनी आणि हळुवार आवाजात गाणी लावली असतील तर तिथली जेवण करण्याची मजाच वेगळी! आणखी एक वैशिष्ट म्हणजे घरी आपण 4 माणसं एकत्र बसून जेवत नाही. पण इथे 500 मुली एकत्र जेवतात.

आता आपण जरा वास्तव्याकडे वळूया. इथे वसतिगृहाच्या 3 इमारती आहेत आणि ह्या प्रत्येक इमारती मध्ये दोन विंग आहेत. ह्या वसतिगृहाची नाव इतकी सुंदर आहेत कि पाऊलो पाऊली आपल्या इतिहासाची आठवण करून देतात.

PAGE No.
DATE / /

वसतिगृहाची नावे संताजी- धनाजी, नेताजी-तानाजी, बहिर्जी - जिवाजी. हि वसतिगृहाची नाव वाचताना किंवा ऐकताना आपल्या कानामध्ये काहि वेगळेच चाहूल देऊन जाते. तसेच येथील अधिकारी वर्गासाठी जे निवासस्थान आहे त्यांची नावे कृष्णा, कोयना, वारणा, येरळा अशी आहेत. हि नाव ऐकला किंवा वाचली कि महाराष्ट्रातल्या जल सृष्टी आठवण करून देतात.

पर्यावरण म्हणजे काय हे इथल्या पर्यावरणाला अनुभवल्यावर कळल. मानवाच्या सुखी जीवनासाठी सभोवतालच वातावरण पर्यावरण सुंदर आणि स्वच्छ ठेवणे गरजेचे आहे. पर्यावरण आपल्याला मिळलेली एक अमूल्य भेट आहे. पर्यावरण हा आपला एक मित्र आहे. पर्यावरण टिकवण्यासाठी झाडे खूप महत्वाची आहेत. निसर्गातील विविध सुंदर गोष्टी मधुन झाडे हे एक निसर्गाची सुंदर देणे आहे. जिला आपण मनापासून जपल पाहिजे. माणसाना जगण्यासाठी झाडाची गरज असते. कारण झाडापासून आपल्याला ऑक्सिजन प्राप्त होतो. ज्यामुळे आपण जिवंत राहू शकतो. येथील झाडे झुडपे ह्या तुरुंची प्रशिक्षण भवनाची शान आहेत. ज्याने ह्या तुरुंची प्रशिक्षण भवनाला सौंदर्य प्राप्त होते.

झाडे वृक्ष म्हणजे काय असतात तुरुंची प्रक्षि. प्रशिक्षण मध्ये आल्यावर कळल कि हि झाडे सुद्धा आपल्याशी बोलतात. इथे रस्त्या वेगवेगळ्या प्रकारची फुलझाडे आहेत. ह्या फुलांचे रंगपण इतके सुंदर आहेत निसर्गामध्ये हे रंग मी कधी पाहिले नव्हते. आपण चित्र रंगवाला बाजारातून जे रंग आणतो त्यातच फक्त बघितले होते. ह्या फुलांच्या रंगामध्ये एक वेगळीच ऊर्जा आहे. मन प्रसन्न करून टाकतात

हे रोप. सिताफळ बागेमध्ये तर एक आगळीवेगळी मजाच आहे. सिताफळ बागेमधील झाडांना जी सिताफळ लागली आहेत त्यांना बघून मन समाधान होते. त्या प्रशिक्षणार्थींनी ते लावण्याची खूप मेहनत घेतली आहे.

पुरची प्रशिक्षण भवनातील मुख्य भाग म्हणजे "प्रशिक्षण भवन". प्रशिक्षणार्थींच्या नऊ महिन्याच्या शिक्षणाचे जिथे उत्तर मिळते. त्यांच्या ज्ञानाच्या साठ्यात भर पाडली जाते म्हणजेच "प्रशिक्षण भवन" प्रशिक्षण भवन म्हणजे हे एक "मंदिरच" आहे. येथील वर्गाची पद्धत वेगळ्या पद्धतीत आहेत. ह्या बांधकामाची पद्धत काही आगळी वेगळीच आहे. मुंबईत अशा बऱ्याचशा मोठ मोठ्या इमारती आहेत. पण त्या इमारतींना ह्या प्रशिक्षण भवनची सर कधीही येऊ शकणार नाही. ह्या प्रशिक्षण भवन ने आम्हा अनुकंपातील महिलांना तर खूप आत्मविश्वास दिला आहे. ह्यासाठी मी त्यांची शतशः आभारी आहे. येथे दोन संगणकाची लॅब आहे. येथील सर्व अधिकारी अत्यंत नम्र वर्तनाने आहेत. एखादा विषय अतिशय रचनात्मक आणि मनोरंजक पद्धतीने स्पष्ट करतात. आम्हा प्रशिक्षणार्थींना ह्या सर्व अधिकारी वर्गाकडून शारीरिक, मानसिक, बौद्धिक बळ मिळाले. मानव जातीला माणूस म्हणून समाजात वागायचे व पोलिस म्हणून समाजात वागायचे शिकवले. ह्याचा खूप अभिमान, आदर व आनंद आहे.

एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे आमची हि बॅच महिलांची होती आणि ह्यात वैशिष्ट्य म्हणजे आमच्या ह्या बॅचला महिला प्राचार्य लाभल्या ह्यासाठी आमचे नशिब खूपच चांगले आहे.

त्यात त्या अतिशय शांत व मनमिळावू आहेतच पण त्यांची कर्तव्यदक्षता पाहता त्या आमच्या सर्वांसाठी प्रेरणास्थान झाल्या आहेत.

"क्षणातच संगळ बदलत असतं" ह्या तत्वावर माननिय प्राचार्य सरांची बदली झाली. तरीसुद्धा मला हे सांगायला आनंद होत आहे कि ते एक पुरुष असूनही त्यांनी आम्हाला इथे समजून घेतल. ह्यांची आम्हा सर्व प्रशिक्षणार्थींना खूप आदर आहे.

तुरची प्रशिक्षण भवनला मी "गुरुकुल" असे नाव दिले आहे.

तुरची प्रशिक्षण भवन पर्यावरणात एक सकारात्मक प्रसन्नता आहे. विश्वास, आपुलकी, आदर नम्रता, अचूकता, सर्वव्यापकता हे सर्व गुण आहेत. तसेच येथील, बाह्यवर्गाचे अधिकारी अंतर वर्गाचे अधिकारी ह्या मध्ये सुद्धा हे सर्व गुण असल्यामुळे येथून बाहेर पडणारा प्रत्येक प्रशिक्षणार्थी हि उत्तम प्रशिक्षण घेऊन भावनिक प्रभावात पोलिस बनूनच बाहेर पडेल हि ईश्वर चरणी प्रार्थना.

आपली प्रशिक्षणार्थी

Shamika.

शमिका सतीश देसाई

मूळ घटक :- ठाणे शहर

PTC No:- 112